

शिवाजी विद्यापीठ : 'युवान' चळवळीच्या भित्तीपत्रकाचे अनावरण कुलगुरु डॉ. आर. के. कामत यांनी केले. यावेळी शेजारी डॉ. ज्योती जाधव, आर. व्ही. गुरव, सिद्धार्थ शिंदे आदी.

# 'युवान' ही तरुणाईला समाजसेवेची प्रेरणादायी चळवळ : डॉ. आर. के. कामत

कोल्हापूर, ता. २८ : 'युवान' ही केवळ एक मोहीम नसून, युवकांना समाजसेवा, ग्रामविकास आणि राष्ट्रनिर्माणासाठी प्रत्यक्ष कृतीची प्रेरणा देणारी चळवळ आहे. या चळवळीच्या माध्यमातून युवकांनी ग्रामविकासाची जबाबदारी स्वीकारत शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल केली, तर बलशाली भारताचे स्वप्न निश्चितच साकार होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी केले.

विद्यापीठात 'युवान' (यूथ ऑर्गनाइझ्ड अँड युनायटेड विथ व्हिजन अँड ॲक्शन फॉर नेशन बिल्डिंग) या राष्ट्रव्यापी युवक चळवळीच्या भित्तीपत्रकाचे अनावरण कुलगुरू डॉ. कामत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनुभवाधारित शिक्षण आणि कृतीवर भर देते. त्याच धर्तीवर युवान ही चळवळ कार्यरत असल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

युवानमध्ये १ ते १५ ऑगस्टदरम्यान युवकांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात स्वयंसेवक म्हणून सहभागी होऊन समाजोपयोगी कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिष्ठाता डॉ. आर. व्ही. गुरव, वर्षा मैंदर्गी, अजय साळी, तंत्रज्ञान विभागाचे संचालक

डॉ. अजित कोळेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, युवानचे जिल्हाप्रमुख श्रेयस पानवलकर, शहरप्रमुख पुष्कर लाटकर उपस्थित होते.

2 9 JUN 2026
क्रांतिसिंह
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू जयंती उत्साहात संपन्न



कोल्हापूर(प्रतिनिधी):– राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती आज शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरी केली.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्र येथेही शाहू महाराजांच्या भव्य तैलचित्रास कुलगुरू डॉ. कामत आणि प्र–कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते पुष्पहार वाहून अभिवादन करण्यात आले.

तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. कामत आणि प्र–कुलगुरू डॉ. जाधव यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ.आलोक जत्राटकर यांनी कसबा बावडा येथील लक्ष्मीविलास पॅलेस या शाहू जन्मस्थळी भेट देऊन शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. त्यानंतर दसरा चौक येथील शाहू महाराजांच्या पुतळ्यासही अभिवादन केले.

विद्यापीठातील अभिवादन कार्यक्रमास शाहू संशोधन केंद्राच्या प्रभारी संचालक डॉ. मंजुश्री पवार यांच्यासह इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, अधिसभा सदस्य ॲड.अभिषेक मिठारी, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ.निखिल गायकवाड, डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. नीलेश बनसोडे, कास्ट्राईबचे आनंद खामकर, डॉ. उत्तम सकट, डॉ. अविनाश भाले, डॉ. दत्तात्रय मचाले, यश आंबोळे, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

2 9 JUN 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
...जी विद्यापीठ. कोल्हापूर

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र

# मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६

## बीएलओ गृहभेटी : ३० जून ते २९ जुलै २०२६

- ✓ गृहभेटीपूर्वी शक्य झाल्यास *voters.eci.gov.in/ ECINeT App* वर मागील SIR मधील आपला किंवा आई-वडिलांचा तपशील (नाव, मतदारसंघ, यादी भाग क्र. अनु. क्र.) शोधून ठेवावा.
- ✓ गृहभेटीदरम्यान, बीएलओने, आपणास दिलेल्या गणना अर्जात आवश्यक माहिती भरून व स्वाक्षरी करून त्याची एक प्रत बीएलओला द्यावी व पोच घेऊन एक प्रत स्वतःजवळ ठेवावी.
- ✓ आपले किंवा आई-वडिलांचे नाव मागील SIR मध्ये नसल्यास, खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र तयार ठेवावे.

१) जन्माचा दाखला, २) पासपोर्ट, ३) इ. १० वी चे (मॅट्रिक) किंवा शैक्षणिक प्रमाणपत्र, ४) रहिवासी प्रमाणपत्र, ५) जात प्रमाणपत्र, ६) सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रम क्षेत्रातील कर्मचारी/निवृत्तीवेतन ओळखपत्र, ७) राज्य/स्थानिक प्राधिकरणाची कुटुंब नोंदवही, ८) शासनाने दिलेले जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र, ९) वन हक्क प्रमाणपत्र, १०) राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा पुरावा, ११) बँक, टपाल कार्यालय, जीवन विमा महामंडळ किंवा सरकारने १ जुलै १९८७ पूर्वी दिलेले ओळखपत्र/ प्रमाणपत्र,

तसेच १२) आधार कार्ड ओळखपत्र पुरावा म्हणून स्वीकारले जाईल.

**गृहभेटींदरम्यान बीएलओंना सहकार्य करा**

**''कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही, कोणताही अपात्र व्यक्ती समाविष्ट होणार नाही''**

२००२ च्या मतदार यादीत तपशील शोधा

**ECINET APP** डाउनलोड करा

**मतदार मदत क्र. १८०० २२ १९५०**

डी.जी.आय.पी.आर. २०२६-२०२७/१३३५

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra